Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – VII Issue – V September - October 2018

# शिक्षक शिक्षणाच्या सबलीकरणात अधिव्याख्यातांची भूमिका

**प्रा. डॉ. वडमारे धनंजय सूर्यकांत**
**वसंतराव नाईक अध्यापक महाविद्‌यालय, जालना**

## प्रस्ताविक Introduction :

आधुनिक काळात शिक्षण ही मानवाची मूलभूत गरज मानली गेली आहे. शिक्षण हे समाज उन्नती, समाज परिवर्तन, राष्ट्र निर्मितीचे प्रभावी साधन आहे. देशहिताच्या दृष्टिने शिक्षणाचा विकास हाच त्या देशाचा विकास आहे आणि शिक्षक शिक्षणाच्या विकासाशिवाय शिक्षणाचा विकास अशक्यप्राय आहे. २०२० भारत महासत्ता म्हणून पाहाताना देशातील उच्च शिक्षणाकडे विद्‌यार्थ्यांनी पाठ फिरवलेली दिसते. रोजगार विरहीत उच्च शिक्षण ही एक महत्वाची समस्या निर्माण झाली आहे.

उच्च शिक्षणाची उपयोगिता सिध्द होण्यास वेळ लागत आहे. नवयुवकाचा आयुष्यातील ५० % वेळ शिक्षण घेणे व हाताला काम मागणे यात जात आहे. पदव्या हातात घेवून नोकरीची भीक मागण्यापेक्षा कौशल्याधारित शिक्षण देऊन देशातील नवयुवक स्वबळावर उभा राहील अशा शिक्षणाची रचना शिक्षक शिक्षणाची रचना उभा करण्याची गरज आहे. विद्‌यार्थी वर्गात बसायला तयार नाही व अध्यापक वेगवेगळया परीक्षा मधून स्वतःची गुणवत्ता सिध्द करण्याचा प्रयत्न करताना दिसतो. देशातील आजपर्यंतच्या सर्वच आयोग समित्यांनी शिक्षक प्रशिक्षणाबद्दल चिंता वर्तवली आहे.

उच्च शिक्षणातील मेडिकल व आय.टी. क्षेत्रापलीकडे बाकी सर्वच क्षेत्र नव्याने उभारण्याची गरज आहे. आज शिक्षक शिक्षणात मोठ्या बदलाची अपेक्षा आहे. ज्यामध्ये कौशल्याधारित अभ्यासक्रम, उत्तम मनुष्यबळ, ताकतवर भौतिक सुविधा आणि तितकेच सोबत प्रमाणिक प्रयत्न करणा-या अधिव्याख्यातांची गरज आहे. रोज नव्याने विचार मांडणारा अधिव्याख्याता पाहिजे आहे. ख-या अर्थाने शिक्षक शिक्षणाच्या सबलीकरणात अधिव्याख्यातांची भूमिका महत्वाचा पाया ठरणार आहेत.

## उद्दिष्टे Objectives :

१) शिक्षक शिक्षणाच्या गुणात्मकते विषयक महाविद्‌यालयीन सुख-सुविधा व कार्यक्रमाची माहिती मिळविणे.

२) शिक्षक शिक्षणाच्या सबलीकरणाबाबत अध्यापक महाविद्‌यालयीन अधिव्याख्यात्यांची भूमिका अभ्यासने.

## शोध गृहीतके Assumption :

१) शिक्षक शिक्षण महाविद्‌यलयामध्ये विविध सुख-सुविधा दिल्या जातात.

२) शिक्षक शिक्षण महाविद्‌यालय स्तरावर गुणात्मक विकासासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

३) शिक्षक शिक्षण महाविद्‌यालयीन अधिव्याख्याता गुणात्मक विकासासाठी विविध कार्यक्रमाद्‌वारे सहभागी होतात.

**संशोधनाचे महत्व Research Importance :**

१) शिक्षक शिक्षणाच्या गुणात्मकतेसाठी दिल्या जाणाज्या सुख-सुविधांची माहिती होते.

२) शिक्षक शिक्षणाच्या सबलीकरणासाठी महाविद्यालयाने कार्यक्रमाची आखणी करता येईल.

3) शिक्षक शिक्षणाच्या सबलीकरणामध्ये अधिव्याख्यात्यांची भूमिका जाणून घेता येईल.

४) शिक्षक शिक्षणाच्या सबलीकरणामध्ये अधिव्याख्यात्यांच्या व्यक्तिगत गुणात्मकतेची ओळख होईल.

**संशोधनाची व्याप्ती Research :**

१) प्रस्तुत संशोधन कार्यामध्ये औरंगाबाद तालुका अंतर्गत येणा-या ०५ अध्यापक महाविद्यालयांचा विचार करण्यात आलेला आहे.

२) प्रस्तुत संशोधना अंतर्गत शिक्षक शिक्षण देणा-या महाविद्यालयातील सुख सुविधांचा विचार करण्यात आलेला आहे.

३) प्रस्तुत संशोधन कार्यामध्ये शिक्षक शिक्षण महाविद्यालयीन गुणात्मकते विषयक कार्यक्रमाचा विचार करण्यात आलेला आहे.

**परिमर्यादा :**

१) प्रस्तुत संशोधन कार्य प्रतिन्यादर्शातील औरंगाबाद तालुका अंतर्गत येणा-या अध्यापक महाविद्यालयापुरतेच मर्यादीत आहे.

२) प्रस्तुत संशोधन कार्य केवळ कार्यरत प्राध्यापकांच्या भूमिकेपुरतेच मर्यादीत आहे.

३) प्रस्तुत संशोधन कार्य शिक्षक शिक्षण महाविद्यालयीन गुणात्मक कार्यक्रमापुरतेच मर्यादित आहे.

**प्रतिन्यादर्श :**

अहमदपूर तालुका अंतर्गत येणाज्या एकुण ०५ शिक्षक शिक्षण महाविद्यालयातील २५ इतक्या अधिव्याख्यातांची निवड सहेतुक न्यादर्शन पध्दतीने करण्यात आलेली आहे.

**संशोधन पध्दती Research Methodology:**

प्रस्तुत संशोधन कार्यामध्ये शिक्षक शिक्षणाच्या सबलीकरणाविषयक अध्यापक महाविद्यालयीन सुविधा व अधिव्याख्यातांच्याभूमिका जाणून घ्यावयाच्या असल्याने सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा आवलंब कण्यात आलेला आहे.

**संशोधन साधन Research Tool:**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी माहिती संकलनाचे साधन उद्दिष्टानुरूप अधिव्याख्याता प्रश्नावली या साधनाच्या साहायाने माहिती संकलित करण्यात आलेली आहे.

**सांख्यिकीय विश्लेषण Statistical Technology :**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी अधिव्याख्याता प्रश्नावलीच्या साहयाने माहिती संकलित करून प्राप्त माहीतीस अर्थ लावण्यासाठीशेकडेवारी या सांख्यिकीय साधनाचा उपयोग करण्यात आलेला आहे.

Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – VII Issue – V September - October 2018

**प्रत्यक्ष कार्यवाही :**

प्रस्तुत संशोधन कार्यांतर्गत महाविद्यालयीन वर्तमान सद्यःस्थिती जाणून घ्यावयाची असल्याने संशोधकाने पुढिल कार्ययोजन केलेली आहे.

विषयनिश्चिती→उद्दिष्टनिश्चिती→गृहीतके मांडणी→साधन निर्मिती→प्रतीन्यादर्ष निवड→संशोधन पद्धती→प्रत्यक्ष साधनाचे आयोजन →माहिती पृथःकरण, अर्थनिर्वचन →निष्कर्ष, शिफारशी मांडणी →परिकल्पना पडताळणी

**सारणी Analysis Table:**

| **प्र. क्र.** | **प्रश्न विवरण** | **होय** | **नाही** |
|---|---|---|---|
| १ | प्रवेशित विद्यार्थी प्रमाण नियमित आहे का? | ४० % | ६० % |
| ४ | आपण रीप्रेशर कोर्स पूर्ण केला आहे का? | ०८ % | ९२ % |
| ५ | विद्यापीठ/युजीसी चा प्रकल्प पूर्ण केला/करीत आहात का? | ०० % | १०० % |
| ६ | संगणक सहाय्यित अध्यापन व्यवस्था आहे का? | ०८ % | ९२ % |
| ८ | विषय पुस्तक/संदर्भ पुस्तक लेखन केले आहे का? | १६ % | ८४ % |
| १० | आपण विद्यापीठ अभ्यास मंडळावर काम केले आहे का? | ०८ % | ९२ % |
| ११ | शिक्षण महाविद्यालयात विविध प्रयोगशाळा कार्यान्वित आहेत का? | १२ % | ८८ % |

| **प्र. क्र.** | **प्रश्न विवरण** | **प्राप्त प्रतिसाद प्रमाण** | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **२५ %** | **५० %** | **७५ %** | **१००%** |
| ३ | किती प्रमाणातील अध्यापक पदे कायम आहेत? | २० % | ५२ % | २८ % | ०० % |
| ९ | संशोधकाचा उपयोग विद्यार्थ्यांसाठी किती प्रमाणात होतो? | ०८ % | ५६ % | २८ % | ०८ % |
| १२ | ग्रंथालयातून विद्यार्थी मागणीची प्रमाण किती आहे? | १० % | १० % | २० % | ६० % |
| १३ | अ.भा. विद्यार्थीसेवा,कल्याण मंडळ, गुणवत्ता विकास | ०० % | ३६ % | ५२ % | १२ % |
| ०७ | प्रमाण | २० % | ५२ % | | |
| १४ | शिक्षण विषयक मासिके,पाक्षिके मध्ये लेखन | ०४ % | ०० % | | |
| १५ | महाविद्यालयात विद्यापीठ-राज्य-राष्ट्रीय कार्यक्रमाचे | ०८ % | ५२ % | | |
| | आयोजन | | | | |
| | आपले महाविद्यालय प्रतीवर्षी स्मरणिका प्रकाशित करते? | | | | |

| **प्र. क्र.** | **प्रश्न विवरण** | **प्राप्त प्रतिसाद प्रमाण** | | |
|---|---|---|---|---|
| | | **नेहमी** | **कधी कधी** | **कधीच नाही** |
| ०७ | शिक्षण विषयक मासिके,पाक्षिके मध्ये लेखन | २० % | ५२ % | २८ % |
| १४ | महाविद्यालयात विद्यापीठ-राज्य-राष्ट्रीय कार्यक्रमाचे | ०४ % | ०० % | ९६ % |
| १५ | आयोजन | ०८ % | ५२ % | ४० % |
| | आपले महाविद्यालय प्रतीवर्षी स्मरणिका प्रकाशित करते? | | | |

**मुख्य निष्कर्ष :**

१) ६०% अधिव्याख्यात्यांच्या मते प्रतिवर्षी विद्यार्थी प्रवेशाचे प्रमाण घटत आहे.
२) सरासरी ९२% अधिव्याख्यातांनी अद्याप रिफ्रेशर कोर्स पूर्ण केलेला नाही.
३) औरंगाबाद तालूका अंतर्गत कार्यरत एकही प्राध्यापकाचा प्रकल्प घेतलेला नाही.
४) अद्याप ९२% अधिव्याख्याता संगणक अध्यापनापासून दूर आहेत.
५) केवळ १६% अधिव्याख्याता संदर्भ पुस्तक लेखनाकडे केलेले आहेत.
६) ८८% अधिव्याख्यात्यांच्या मते अध्यापक महाविद्यालयात विविध प्रयोगशाळा कार्यान्वित नाहीत.
७) अध्यापक महाविद्यालयातील ५०% पदे कायम भरलेली आहेत.
८) ५६% अधिव्याख्यात्यांच्या मते संशोधनाचा विद्यार्थ्यांसाठी उपयोग होतो.
९) ७५% विद्यार्थी विकासासाठी विद्यार्थी कल्याण, गुणवत्तेसाठी प्रयत्न केले जातात.
१०) नेहमी शिक्षण विषयक लेखन करणाज्या अधिव्याख्यातांचे प्रमाण २०% आहे.
११) केवळ ४% अध्यापक महाविद्यालयात संशोधन विषयक विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.
१२) प्रतिवर्षी केवळ ८% अध्यापक महाविद्यालयात स्मरणिका प्रकाशित केली जाते.

**शिफारशी :**

१) सर्वच अधिव्याख्यातांनी रिफ्रेशर कोर्स पुर्ण करावा.
२) विविध स्तरावरील संशोधन प्रकल्प हाती घेण्यामध्ये प्राध्यापकांनी पुढाकार घ्यावा.
३) जास्तीत जास्त वर्गाध्यापनासाठी संगणक सहाय्यित अध्यापनासाठी प्रयत्न करावा.
४) पुस्तक लेखन, संदर्भ पुस्तकलेखन, शिक्षण विषयक मासिकातून लेखणासाठी पुढाकार घ्यावा.
५) सर्वच अध्यापक महाविद्यायातील सर्वच प्रयोगशाळा अद्यावत करण्यात याव्यात.
६) अधिव्याख्यातांची पदे पूर्णपणे कायम भरलेली असावीत.
७) आपापल्या संशोधनाचा उपयोग विद्यार्थ्यांसाठी वर्गाध्यापनातून करावा.
८) विद्यार्थी कल्याण, गुणवत्ता विकासासाठी सर्वच अध्यापक महाविद्यालयांनी पुढाकार घ्यावा.
९) सर्वच अध्यापक महाविद्यालयात संशोधन विषयक कार्यक्रमाचे आयोजन प्रतिवर्षी करण्यात यावे.
१०) विद्यार्थी कला, गुणांना वाव देणारी स्मरणिका, प्रतिवर्षी प्रकाशित करण्यात यावी.

**संदर्भ सूची Bibliography:**

१) पाण्डेय, रामशकल (२००५), शैक्षणिक परिवर्तन दिल्ली अध्यापक पब्लिशर्स एण्ड. डिस्ट्रीब्युटर्स
२) सप्रे निलिमा, पाटील प्रिती, (२००५), शिक्षणातील विचार प्रवाह, कोल्हापुर: फडके प्रकाशन.
३) www.Knowledge.commission.gov.in.
४) घोरमाडे के यु आणि घोरमोडे कला, (२००८), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपुर: विद्या प्रकाशन